महासागर अमरावती
बुधवार, दि. 9 ऑक्टोंबर 2024
पान 3

## हत्येची मालिका थांबेना...

# लव्ह ट्रँगल : तरुणीकडून तरुणीची हत्या

### मारेकरी तरुणी फरार, सुपर एक्स्प्रेस हायवेवरील घटना



मृतक



***महासागर प्रतिनिधी***

***अमरावती,( दि.8 )- शहर पोलिस आयुक्तालयाअंतर्गत रविवार रात्रीपासून सुरु झालेली हत्येची मालिका थांबण्याचे नाव घेत नाही. दोन दिवसात पाच हत्यांनी शहरात एकच खळबळ उडाली आहे. मंगळवार, 8 ऑक्टोबर रोजी रात्री 8 वाजताच्या सुमारास राजापेठ ठाण्याच्या हद्दीतील सुपर एक्स्प्रेस हायवेवरील श्रीकृष्ण मंदीराजवळ प्रेमाच्या त्रिकोणातून ( लव्ह ट्रँगल ) तरुणीने एका तरुणीची चाकूने भोसकून हत्या केली. घटनेनंतर मारेकरी तरुणी फरार झाली असून पोलीस तिचा शोध घेत आहेत.***

शुभांगी काळे (26) रा. आर्वी, वर्धा असे मृताचे नाव आहे. शुभांगीच्या परिचयातील सुरज देशमुख (वय 26 रा.कुऱ्हा, ता.तिवसा) याचे यातील मारेकरी तरुणीसोबत प्रेमसंबंध आहेत. सुरजचे शुभांगीसोबतही प्रेमसंबंध असल्याचा संशय त्याच्या या प्रेयसीला होता. त्या कारणावरून त्यांच्यात वाद होत होते. त्यामुळे तरुणाने आपल्या प्रेयसीची शुभांगीसोबत भेट घालून देण्याचा निर्णय घेतला. दरम्यान, मंगळवारी शुभांगी ही एमआयडीसी जवळील सुपर एक्सप्रेस हायवेला लागुन असलेल्या श्रीकृष्ण मंदिरात एका मैत्रिणीच्या मुलाच्या वाढदिवसानिमित्त अमरावतीत आली होती. त्यामुळे तरुणाने आपल्या प्रेयसीची शुभांगीसोबत भेट घालून देण्यासाठी सायंकाळी 7.30 वाजताच्या सुमारास तिला सुपर एक्स्प्रेस हायवेवरील एका मंदिराजवळ बोलाविले. शुभांगी तेथे पोहोचल्यावर तरुणाच्या प्रेयसीने तिच्यासोबत वाद घातला. या वादात तिने शुभांगीवर चाकूने हल्ला चढविला.



### हृदय पंचर झाल्याने मृत्यू

मारेकरी तरुणीने शुभांगीच्या गळ्यावर, हातावर व छातीमध्ये चाकुने वार केले. यातच हृद्यात घाव बसल्याने हृदय पंचर होवून शुभांगीचा मृत्यू झाला असल्याचे डॉक्टरांचे म्हणणे आहे. या हल्ल्यानंतर मारेकरी तरुणी तेथून फरार झाली. सुरज ने जखमी शुभांगीला आपल्या वाहनाने तातडीने जिल्हा सामान्य रुग्णालयात नेले. मात्र, डॉक्टरांनी तेथे तिला मृत घोषित केले. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच राजापेठचे ठाणेदार पुनीत कुलट यांनी आपल्या ताफ्यासह जिल्हा सामान्य रुग्णालय गाठले. पोलीस उपायुक्त गणेश शिंदेही तेथे पोहोचले. त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळ गाठून पंचनामा केला. पोलीस फरार झालेल्या तरुणीचा शोध घेत आहेत. तर सुरजसह अन्य एका तरुणीची चौकशी पोलीसांकडून केली जात आहे.

## त्या हत्येतील फिर्यादीची ही हत्या

**अमरावती** - येथील जयस्तंभ चौक ते रेल्वे ब्रीज दरम्यान 6 ऑक्टोबर रोजी सायंकाळी 6.30 च्या सुमारास महाजनपुरा येथील रहिवासी मोंटू गोळे या तरुणाचा चार तरुणांनी चाकूने वार करून खून केला. यावेळी मोंटू गोळे याच्यासोबत दुचाकीस्वार असलेला त्याचा मित्र व मोंटूच्या हत्या प्रकरणातील फिर्यादी अजय विजयराव वानखडे (25, खरकडीपुरा) याचाही खून करण्यात आला. अजय वानखडे याचा मृतदेह बडनेरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अंजनगाव बारी रस्त्यावरील जंगल परिसरातून 7 ऑक्टोबर रोजी सायंकाळी 6 वाजताच्या सुमारास मिळून आला. त्याच्या मानेवर धारदार चाकूने हल्ला केल्याचेही निशाण



आढळून आले. मोंटू गोळे आणि अजय वानखडे यांच्या हत्येचा काय संबंध आहे आणि अजय वानखडे यांची हत्या कोणी केली, का केली, तसेच मोंटू गोळे यांच्या हत्येतील 4 अल्पवयीन आरोपींचा कोतवाली पोलीस तपास करत आहेत त्याला आधीच अटक केली होती. त्यामुळे हे संपूर्ण प्रकरण बऱ्याच अंशी संशयास्पद दिसत आहे. गेल्या 6 ऑक्टोबर रोजी सायंकाळी महाजनपुरा परिसरात राहणारा मोंटू गोळे हा त्याचा मित्र अजय वानखडे याच्यासोबत दुचाकीवरून जयस्तंभ चौकातून रेल्वे स्टेशनकडे जात असताना मागून चार युवक आले. त्यांनी यांचा रस्ता अडवण्याबरोबरच त्यांनी मंटू गोळे यांच्यावर धारदार चाकूने हल्ला केला. यावेळी मोंटू गोळे यांच्यासोबत उपस्थित असलेले अजय वानखडे हा घटनास्थळावरून पळ काढत या घटनेची माहिती सिटी कोतवाली पोलीस ठाणे गाठून दिली होती.

# ट्रकच्या धडकेत एक ठार, एक गंभीर

### एमआयडीसी टी पॉइंटवरील घटना

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती**- राजापेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एमआयडीसी टी पॉइंट येथे ट्रकच्या धडकेत दुचाकीवरील एकाचा मृत्यू झाला, तर एक गंभीर जखमी झाला. मृतक हा धारणी येथील रहिवासी असून, मृताचे नाव अद्याप समजू शकलेले नाही. स्वप्नील नंदलाल गाडगे (25, धारणी) असे जखमी तरुणाचे नाव आहे. त्याला उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले.

मेळघाटातील धारणी व चिखलदरा येथील अनेक तरुण रोजगाराच्या शोधात शहरात येतात. धारणी आणि चिखलदरा येथील अनेक तरुण एमआयडीसीमध्ये काम करतात. अशा स्थितीत मंगळवारी दुपारी 12.30 च्या दरम्यान बडनेरा मिनी बायपासच्या एमआयडीसी टी पॉइंटवर भरधाव वेगाने जाणारा ट्रक क्रमांक एमएच 46/एएफ 8371 आणि मोटारसायकल क्रमांक एमएच 27/सीई 2618 यांच्यात धडक झाली. अपघात इतका भीषण होता की, मोटरसायकल चालकाचा घटनास्थळीच मृत्यू झाला. तर स्वप्नील गाडगे हा गंभीर जखमी झाला. अपघाताची माहिती मिळताच घटनास्थळी नागरिकांची गर्दी झाली. या



प्रकरणाची माहिती तात्काळ राजापेठ पोलिसांना देण्यात आली.

राजापेठ पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक पुनित कुलट, सहायक पोलिस आयुक्त जयदत्त भंवर, वाहतूक पोलिस रिटा उईके घटनास्थळी पोहोचले. जखमी स्वप्नील गाडगे यांना तातडीने अमरावती जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी पाठवण्यात आले. जिथे त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. मृत तरुणाचा मृतदेह जिल्हा रुग्णालयाच्या शवागारात ठेवण्यात आला आहे. राजापेठ पोलिसांनी चालकाला अटक करून ट्रक जप्त केला आहे. पुढील तपास राजापेठ पोलीस करत आहेत.




आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४




# वेतन शासनाचे, सेवा खाजगी रुग्णालयात

## जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी शोधावे 'झारीतील शुक्राचार्य'

**महासागर प्रतिनिधी**
**वरुड, ( दि.8 )-** जनसामान्यांना वेळेवर, मोफत आणि योग्य उपचार मिळावा याकरिता राज्य शासन कोट्यवधी रुपयांचा खर्च करताहेत. लाख रुपयांपर्यंत दरमहा वेतन देवून डॉक्टरांची नियुक्ती शासकीय रुग्णालयात करतात. मात्र या जनसुविधेला जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी ज्या डॉक्टरांवर असते ते डॉक्टर आपल्या खाजगी सेवेमध्ये व्यस्त आहेत. शासनाचे वेतन घेवून जनसामान्यांच्या सुविधांमध्ये 'झारीतील शुक्राचार्या' सारखे अडकून बसलेल्या अशा डॉक्टरांचा शोध घेवून जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्याची मागणी जनसामान्यांकडून होत आहे.

शासकीय रुग्णालयात उपचाराकरिता आलेल्या रुग्णांवर तेथे उपस्थित नर्स आणि कंपाउंडरच उपचार करताना दिसून पडते. तळागाळातील जनतेला दर्जेदार उपचार मोफत मिळावा याकरिता राष्ट्रीय आरोग्य अभियान सुरू करण्यात आले. या अभियानांतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येत आहे. रुग्णालयापासून गावापर्यंत पोहोचत रुग्णसेवा देण्याचा त्यामागचा शासनाचा हेतू आहे. या अभियानाकरिता मोठ्या



प्रमाणात निधीची तरतूद करण्यात आली आहे. या अभियानात कंत्राटी तत्वावर अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

या अभियानातील हे अधिकारी आणि कर्मचारी अनेकदा आपल्याला शासनाच्या सेवेत कायम करण्याची मागणी देखील करतात. शासकीय रुग्णालयात वैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे, मात्र राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत हे वैद्यकीय अधिकारी मुख्यालयी न राहता, आपल्या खाजगी रुग्णालयातील रुग्णसेवेमध्ये व्यस्त असतात, ज्याचा दैनंदिन कामावर विपरीत परिणाम होतो, हे विसरुन चालणार नाही.

### असे आहेत नियम

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत वैद्यकीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारचे खाजगी वैद्यकीय सेवा देण्यात येऊ नये असे स्पष्ट आदेश आहे. अशा प्रकारचे खाजगी सेवा देणारे वैद्यकीय अधिकारी आढळल्यास त्यांना कारणे दाखवा नोटीस देत, खुलासा मागविण्यात यावा. समाधानकारक खुलासा नसल्यास त्यांना संबंधित डॉक्टरांची सेवा समाप्तीही करता येते. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत वैद्यकीय अधिकारी यांनी खाजगी सेवा देऊ नये, अन्यथा कायदेशीर कारवाई करण्यात येईल असे जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांचे स्पष्ट आदेश असतानाही आजही शासकीय सेवा देणाऱ्या अनेक डॉक्टरांची खाजगी प्रॅक्टिस सुरूच आहे. हे विशेष.

## दुचाकीवर तलवार घेऊन जाणाऱ्या तिघांना अटक

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 8 )** – राजापेठ येथील रघुवीर हॉटेलसमोर दुचाकीवर तलवारी घेऊन आलेल्या तीन तरुणांना राजापेठ पोलिसांनी अटक केली आहे. 7 ऑक्टोबर रोजी दुपारी 4 वाजता सदर कारवाई करण्यात आली. राजापेठ पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक मिलिंद हिवरे व त्यांचे पथक परिसरात गस्त घालत होते. यावेळी काही तरुण दुचाकीवर तलवारी घेऊन फिरत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. राजापेठ चौकातून दुचाकीवरून जात असताना पोलिसांनी तत्काळ तिघांनाही पकडले. आरोपी राजा प्रभू धांडे (23, रायपूर, चिखलदरा) याच्याकडे तलवार होती. अन्य आरोपी प्रजा प्रभू धांडे (21, रायपूर चिखलदरा) आणि रमण बाळकू बेलसरे (19, बेरोजा, चिखलदरा) हे मोटार सायकलवरून जात होते. पोलिसांनी तिन्ही आरोपींना अटक केली.

# 87 लाखांचा दंड विरला हवेत, सातबाऱ्यावर बोजा नाही?

## तत्कालीन तहसीलदार यांची भूमिका संशयास्पद



**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर बाजार,( दि.8 )-** तालुक्यात मोठ्या प्रमाणात गौण खनिज तस्करी होत असल्याचे स्पष्ट दिसत असताना यावर कारवाई करण्यासाठी आता पर्यत महसूल विभागातील एकाही अधिकाऱ्याने स्वत: मोहीम सुरू केली नाही. जनसामान्यांनी गौण खनिजची होत असलेली तस्करी प्रशासनाच्या लक्षात आणून दिले, प्रकरण शांत करण्याकरिता प्रशासनाने दंड केला, परंतू ही दंडाची कारवाई पुढे हवेत विरली असल्याचे दिसत आहे. आतापर्यंत या दंडाची वसुली झालेली नाही. दंड वसूलच करायचा नसेल तर कारवाई करण्याचे नाटक तरी का केले जाते? असा प्रश्न निर्माण झाला आहे.

पूर्णा मध्यम प्रकल्प या ठिकाणी होत असलेल्या अवैध गौण खनिज वाहतूकी विरोधात भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी मोहिम छेडल्यावर हा अवैध उत्खननाचा प्रकार समोर आला. हा समोर येईपर्यंत तलाठी, मंडळ अधिकारी, कोतवाल, पोलीस पाटील निद्रीस्त होते का? असाही प्रश्न जनसामान्यांकडून विचारल्या जात आहे. त्यानंतर अवैध उत्खनन प्रकरणी तत्कालीन तहसीलदार धीरज स्थूल यांनी या उत्खनन ला जबाबदार म्हणून पूर्णा मध्यम प्रकल्प चे अभियंता यांना जवळपास 57 लक्ष रुपयांचा दंड आकारला. मात्र त्या ठिकाणी काम करणारे अधिकाऱ्यांनी गौण खनिज ची उत्खनन आणि वाहतूक कोणासाठी केली. हे अभियंता राजकारण्यांचा बळीचा बकरा ठरल्याचे दिसत आहे.

> दोन्ही प्रकरण मधील दस्तऐवज पाहून आणि त्यावर आता पर्यत काय चौकशी, निर्णय झाले यांची माहिती घेवून पुढील कारवाई करण्यात येईल.
>
> **रामदास शेळके,**
> **तहसीलदार, चांदूर बाजार.**

दुसरीकडे चिंचोली येथे नागरिकांनी अवैध उत्खनन आणि वाहतूक प्रकरणी तक्रार दाखल केली. त्या तक्रारीच्या आधारे मौजा जावरा गट क्रमांक 89 मधून गौण खनिज चे विना परवानगी उत्खनन आणि वाहतूक झाल्याचे चौकशी अंती निष्पन्न झाले. यामध्ये तत्कालीन तहसीलदार गीतांजली गरड यांनी संबंधित मालकाला 30 लाखाच्या दंडाचा आदेश पारित केला. मात्र या दोन्ही तहसीलदारांनी दिलेल्या दंडाची वसुली अनेक महिने उलटूनही वसूली झाली नाही. त्यामुळे प्रभारी तहसीलदार तरी पुढाकार घेतील, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करित आहेत. सुट्टीच्या दिवशीव सुर्यास्त नंतर होत असलेल्या गौण खनिज वाहतूक वर आता कारवाई साठी महसूल विभाग काय ठोस पावले उचलतील हे येणाऱ्या काही दिवसात कळेल. की, पुन्हा जे आधीच्या तहसीलदार यांनी केले ते पण हेच करतील हे पहायला नवीन तहसीलदार यांना वेळ देने गरजेचे आहे.

# आभासी युगातही सीतादही पूजनाची परंपरा कायम

## बळीराजा व महिला मजूर सीतादही पूजन केल्याशिवाय कापूस वेचत नाही

### ग्रामीण भागात कापूस वेचणीला सुरुवात

### सितादही करुनच कापुस वेचणी






**नितीन दुबुर्डे**
**पथ्रोट,( दि.8 )-**सृष्टीची निर्मिती जारज, श्वेतज, जलज, अंडज, बीजज या सर्व पद्धतीने झाली. बीजजपासून निर्मित कापसाच्या बोंडाने समग्र सृष्टीतील जारज निर्मित मानवाचे अंग झाकून लज्जारक्षण केले. कापसापासून वस्त्र तयार करण्यात आले. बळिराजाकरिता जणू पांढरे सोनेच सृष्टीने तयार केले. सध्या शेतशिवारांमध्ये हाच कापूस निघाला असून तो वेचण्याची तयारी सुरू झाली आहे. कापूस बोंडातून काढण्यालाच वेचणी म्हणतात, आणि ही वेचणी सुरू करण्यापूर्वी जो काही विधी केला जातो, त्यालाच सीतादही असे ग्रामीण भागात संबोधले जाते.

हरितक्रांतीपूर्वी पारंपरिक बियाणे व नवनवीन आधुनिक तंत्रज्ञान नसल्याने कापूस शक्यतोवर दिवाळीनंतरच निघायचा. हल्ली तंत्रज्ञानाने संशोधित कापूसवाणाचे बियाणे अल्पावधीतच कापूस देते. तसेच सिंचनाची सोय झाल्याने पावसाळ्यापूर्वीच लागवड होत असल्याने विजयादशमी पूर्वीच कापूस वेचणीस सुरुवात होते. बळिराजा व महिला मजूर सीतादही पूजन केल्याशिवाय कापूस वेचत नाही. पुर्वी शेतकरी ज्वारी सोंगणी, खुडणी, मळणी करून ज्वारी घरात घेत नाही, तोच सीतादहीच्या तयारीलाही लागायचा हल्ली ज्वारी ऐवजी सोयाबीन पिकाकडे वळला. सीतादहीकरिता घरधनीन वेचणीच्या पहिल्या दिवशी गाईच्या दुधाचे विरजण लावून दही तयार करते. सकाळीच मऊ भात शिजवून पूजेचीह सामुग्री फुले, हळदकुंकू तयार ठेवून सुवासिनी मजुरांकरवी पूजेची आरास केली जाते. 7 दगड धुऊन कपाशीच्या झाडाजवळ मांडून कापूस फुलाच्या गोप्याची प्रतिमा तयार केली जाते. नंतर नवीन कापसास पीळ देऊन त्याचा पाळणा केल्यावर त्यात गोपा निजवला जातो. पूजा संपताच नारळ फोडून साखर मिश्रीत दहीभाताचे बोने शेतात फेकता धन्याले धन दे... आमाले अन्न दे... अशी आर्जव काळ्या आईस केली जाते. बोनं पसरवण्यामागे कापूस पिकावर मित्र किडी येऊन शत्रू कीटकांचा नाश होऊन पीक भरघोस व्हावे, हा हेतू असावा, असे वयोवृद्ध महिला मजुराने सांगितले. सध्याच्या आभासी युगातही शेतकरी सीतादही पूजनाची परंपरा कायम राखून आहे. हे निश्चितच वाखाणण्याजोगे आहे.

# नगरपरिषदेवर धडकला आक्रोश मोर्चा

### नागरिकांनी विविध समस्यांचा वाचला पाढा



**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी,( दि.8 )-** शहरातील समस्त जागरूक नागरिक, सर्वपक्षीय कार्यकर्ते, पदाधिकारी यांच्या वतीने सोमवारी (दि.7) नगर परिषदेवर धडक दिली. नागरिकांनी यावेळी शहरातील विविध समस्यांचा पाढा वाचला. जनआक्रोश मोर्चा काढण्यात येऊन मोर्शी नगरपरिषद कार्यालयावर येऊन धडकला.

सर्वप्रथम जयस्तंभ चौक येथील हजारो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या गणपती मंदिरापासून या जनआक्रोश मोर्चाची सुरुवात करण्यात येऊन हा मोर्चा प्रमुख बाजारपेठ, गांधी चौक, गुजरी बाजार चौक येथून थेट नगरपरिषद कार्यालयावर नेण्यात आला.

मुख्याधिकारी यांनी आंदोलनकर्त्यांना एक दिवसाआड पाणी देण्याचा निर्णय मागे घेण्यात आला असून सध्या पूर्ववत दररोज पाणीपुरवठा सुरू करण्यात आला. स्वच्छतेचे काम सुद्धा सुरू असून नागरिकांनी त्यासाठी सहकार्य करणे गरजेचे आहे. शासनातर्फे घरकुल योजनेचे आलेले पैशाचे टप्पे वितरित करण्यात आले असून उर्वरित टप्पे शासनाकडे प्रलंबित आहे.शासनाकडून निधी प्राप्त झाल्याबरोबर टप्पे वितरित करण्यात येणार आहे.वरुड नगर परिषद तर्फे बांधकाम कामगार कल्याण योजनेअंतर्गत लाभार्थी कामगारांना सही व शिक्का देण्यात येत आहे.मात्र मोर्शी मध्ये देण्यात येत नसल्याची खंत रवींद्र गुल्हाने यांनी व्यक्त केली असतांना मुख्याधिकारी यांनी वरिष्ठांचे मार्गदर्शन घेऊन शिक्का व सही देण्यात येईल.असे खंडन करून तूर्तास जनआक्रोश मोर्चा आंदोलन मागे घेण्यात आले.

आंदोलन दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांनी चोख पोलीस बंदोबस्त तैनात केला होता.यावेळी रवींद्र गुल्हाने, मोहन मडघे, नितीन राऊत, हर्षल चौधरी, नितीन पन्नासे, राजू साठवणे, क्रांती चौधरी, उमेश शहाणे, भूषण कोकाटे, मनोहर शेंडे, निलेश रोडे, नईम खान, अजिस पठाण, ईसराल अली, सुनील ढोले, सुहास ठाकरे, विजय लड्ढा, गणेश उमाळे, केशवराव पांडे, रामभाऊ कळंबे, प्रदीप इंगळे, अमित काळे, अनिता लांजेवार, संगीता तायडे यासह मोर्शी शहरातील शेकडो नागरिक मोर्चात सहभागी झाले होते.

### 'आमदार हटाव मोर्शी बचाव' च्या घोषणा

आंदोलकांनी नगरपरिषद कार्यालयासमोर ठिय्या देऊन 'आमदार हटाव मोर्शी बचाव' अशी नारेबाजी करून परिसर दणाणून सोडला होता. तथापि नगरपरिषद तर्फे 1 आक्टोंबर पासून शहराला एक दिवसाआड पाणी देण्याचा निर्णय घेतला. शहरात घाणीचे साम्राज्य पसरलेले असून कचरा फेको आंदोलनानंतर व्यवस्थित सुरू झालेले स्वच्छतेचे काम पुन्हा युद्ध पातळीवर सुरू करावे. मोर्शी शहरातील घरकुल योजनाधारक लाभार्थ्यांचे प्रलंबित असलेले टप्पे लवकरात लवकर निर्गमित करण्यात यावे. शहरातील नागरिकांना प्रॉपर्टी कार्डचे वाटप करण्यात यावे. बांधकाम कामगार कल्याण योजनेअंतर्गत अर्ज करण्यात येत असतांना लाभार्थी कामगारांना नगरपरिषद प्रशासनातर्फे सही व शिक्का देण्यात यावा. अशा विविध मागण्या रेटून धरण्यात आल्या.



श्रीकृष्ण दुर्गा उत्सव मंडळ, हिवरखेड



स्वस्तिक दुर्गा उत्सव मंडळ, हिवरखेड



आदर्श दुर्गा उत्सव मंडळ, हिवरखेड



सत्संग दुर्गा उत्सव मंडळ, हिवरखेड



बाल शिवाजी दुर्गा उत्सव मंडळ, हिवरखेड



जय भवानी जय शिवाजी दुर्गा उत्सव मंडळ, हिवरखेड

महासागर अमरावती

बुधवार, दि. 9 ऑक्टोंबर 2024

पान 6

# वडाळी वनक्षेत्रात बिबटचा मृत्यू

## दोन बिबटची झुंज झाल्याचा अंदाज | घटनास्थळीच शवविच्छेदन व अंत्यसंस्कार

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 8) -** वडाळी वनपरीक्षेलगत असलेल्या लीलाधर शामराव गोसावी या शेतकऱ्याच्या शेतात मंगळवारी बिबट्याचा मृतदेह आढळून आला. दोन बिबटची झुंज झाल्यामुळे एकाने मृत्यू झाल्याचा अंदाज वर्तविण्यात येत आहे. मृत बिबट्याच्या अंगावर खोल जखमा होत्या. मृतदेह कुंजलेल्या अवस्थेत होता. त्यामुळे वनाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत मृत मादी बिबट्याचे घटनास्थळीच शवविच्छेदन करून अंत्यसंस्कार करण्यात आले.



सुत्रानुसार, वडाळी-चांदूर रेल्वे-मोर्शी वनपरिक्षेत्र बिबट्यांची संख्या अधिक असून, अनेकदा बिबटचा मुक्तसंचार सुरु असते. मंगळवारी सकाळी वडाळी वनविभागातील अधिकार्यांना माहिती मिळाली की, बिबट्याचा मृतदेह शेताजवळील झुडुंपामध्ये आहे. या माहितीवरून वनसंरक्षक देसाई, वडाळी वनपरिक्षेत्र अधिकारी वर्षा हरणे, परिक्षेत्र अधिकारी कैलास इंगळे, पशुवैद्यकीय शल्यचिकित्सक डॉ.अतुल खेरडे, डॉ.नितीन पाटणे यांनी घटनास्थळी पोहोचून पंचनामा, शवविच्छेदन व अंत्यसंस्काराची प्रक्रिया पूर्ण केली.

# सागर कलानेंना मिळावी काँग्रेसची उमेदवारी



## आ.ठाकूर व बबलू देशमुख यांना साकडे

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि.8) -** जिल्ह्यातील काँग्रेसचे प्रमुख नेते माजी पालकमंत्री ॲड.यशोमती ठाकूर व काँग्रेस जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांच्या घरी भेट देऊन दर्यापूर विधानसभाकरिता मातंग समाजाला उमेदवारी देण्यात यावी, अशी मागणी दर्यापूर, अंजनगाव सुर्जी विधासभेतील मतदार आणि सकल मातंग समाज बांधवांनी त्यांना दिलेल्या निवेदनात केली.

मागील 18 वर्षापासून सागर कलाने हे काँग्रेसचे निष्ठावान कार्यकर्ते म्हणून कार्य करत आहे. ते सध्या काँग्रेसच्या विविध पदावर कार्यरत आहेत. अनुसूचित जाती प्रदेश महासचिव, युवक काँग्रेसचे प्रदेश सचिव, विशेष कृती दलचे सदस्य या पदावर कार्यरत राहून पक्षाचे संघटन मजबूत करण्याकरिता कार्यशील आहे. ते दर्यापूर येथील स्थानिक निवासी आहेत.

75 वर्षापासून समाजाला प्रतिनिधीत्व मिळाले नाही स्वातंर्त्यापासून मातंग समाजाला जिल्ह्यात एकदाही प्रतिनिधीत्व करण्याची संधी मिळाली नाही. यावेळी आरक्षित असण्याची शेवटची टर्म असून पहिली संधी द्यावी, अशी मागणी मातंग समाजाने व नागरिकांनी आ. यशोमती ठाकूर व जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांना केली आहे

# ऑक्टोबर हीटच्या झळा, शरीरातून घामाच्या धारा

## कुलर, एसीचा वापर पुन्हा वाढला

## विजेचीही मागणी वाढणार

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 8)-** एकिकडे नैऋत्य मान्सून विदर्भासह महाराष्ट्रातून काढता पाय घेण्याच्या तयारीत असताना दुसरीकडे ऑक्टोबरच्या हीटने नागरिकांची होरपळ होत आहे. तापमान सरासरीच्या वर सुरू असून उकाड्यामुळे शरीरातून घामाच्या धारा वाहत आहेत. उकाड्यामुळे पंखे, कुलर, एसीचा वापर वाढला आहे.

पावसाळ्याचा यंदाचा नैसर्गिक कार्यकाळ पूर्ण झाला असून हळूहळू त्याने परतीचा प्रवास सुरू केला आहे. राज्यात 5 ऑक्टोबरपासून हा प्रवास सुरू झाला व येत्या दोन-तीन दिवसात बहुतेक भागातून त्याने गाशा गुंडाळलेला असेल. दरम्यान सप्टेंबरमध्ये मान्सूनचे शेवटचे आवर्तन झाल्यानंतर ऑक्टोबरमध्ये पावसानेही शेवटचा 'गुडबाय' केल्याची स्थिती आहे.

संपूर्ण आठवड्यात एकदाही हजेरी लावली नाही. 5 ऑक्टोबरला सायंकाळी हलक्या सरी बरसल्या असल्या तरी त्यात पावसाळ्याचा 'फिल' नव्हता. उलट वाढलेल्या उन्हाच्या झळांनी उकाड्याचा त्रास सुरू केला आहे. दिवसाचे कमाल तापमान सरासरीच्या वर चालत आहे. हलक्या पावसाळी आर्द्रतेमुळे उकाड्याची तीव्रता अधिक जाणवत आहे. त्यामुळे कुलर, एसीचा वापर अधिकच वाढला आहे. त्यामुळे वीजेची मागणीही वाढली आहे.

# काँग्रेसने जिलेब्या तळल्या मात्र जनतेने त्यात पाक भरला नाही

## हरियाणातील पराभवावरुन भाजप नेते डॉ.अनिल बोंडेंचे काँग्रेसवर टीकास्त्र

### मोर्शीमध्ये भाजप पदाधिकाऱ्यांकडून अभूतपूर्व जल्लोष

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,(दि.8) -** प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत हरियाणातील जनतेने तिसऱ्यांदा राज्याची सूत्र ही भाजपच्या हातात दिली आहेत. आताताई काँग्रेसनं विजयापूर्वी जिलेब्या तळल्या होत्या, मात्र जनतेने त्यात पाक भरला नाही, अशी टीका देखील भाजपा जिल्हाध्यक्ष डॉ.अनिल बोंडे यांनी केली आहे. बोंडे यांच्या नेतृत्वात हरियाणातील भाजपच्या अभूतपूर्व विजयाचा जल्लोष मंगळवारी (ता.8) भाजपा तर्फे येथील जयस्तंभ चौकात करण्यात आला. दरम्यान भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी फटाके उडवत, मिठाई भरवत आनंदोत्सव साजरा केला.



हरियाणा विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टीने तिसऱ्यांदा अभूतपूर्व विजय मिळवला. त्यानिमित्त राज्यसभा खासदार तथा भाजपा नेते अनिल बोंडे यांच्या नेतृत्वाखाली मोर्शीच्या जयस्तंभ चौकात भारतीय जनता पार्टीने मोठा विजयोत्सव साजरा केला. फटाके, गुलालांची उधळण ढोल ताशांची आतषबाजी करत भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी नृत्यावर थीरकत हा आनंदोत्सव साजरा केला. हरियाणा तो झाकी है, महाराष्ट्र अभी बाकी है अशा गगनभेदी घोषणा यावेळी देण्यात आल्या. दरम्यान बोलताना अनिल बोंडे म्हणाले, हरियाणात भाजपचा दणदणीत विजय झाला. 49 जागांवर भाजपने आघाडी घेतली. तिसऱ्यांदा येथे भाजपचे सरकार स्थापन झालं.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर हरियाणातील जनतेने विश्वास ठेवला. त्यामुळे आता न भूतो न भविष्यती येथील विकास झाल्याशिवाय राहणार नाही. यावेळी डॉ. वसुधा बोंडे, अर्चना मुरुमकर, अमित कुब?, भाजपचे तालुकाध्यक्ष निलेश शिरभाते, दत्ता गेडाम, राहुल चौधरी, रवी मेटकर, अजय आगरकर, अशोक देशमुख, राजेश्वर निस्ताने, नितिन उमाळे, हर्षल चौधरी, मनोज मोकळकर, आप्पा गेडाम, हरीविजय गेडाम, रावसाहेब अ?ऊ, नितिन चिखले, बाबाराव जाधव, उमेश जवंजाळ अनिता लांजेवार, प्रतिभा राऊत, विद्या गेडाम, संगीता तायडे, माया वानखडे, माया बसुंदे, भारती महाजन, सुनिल ढोले, ज्योती मालवीय यांच्यासह भाजपचे इतर पदाधिकारी या विजयी जल्लोषात सहभागी झाले होते.

### वरुड-मोर्शीतही कमळ फुलेल - डॉ.अनिल बोंडे

भाजपने जयस्तंभ चौकात मोठा जल्लोष साजरा केला. हरियाणातील विजयाचा महाराष्ट्रात आनंद साजरा होत आहे. हरियाणात जे झालं तेच महाराष्ट्रात होईल. कमळाचा विजय होईल. अस म्हणत डॉ. अनिल बोंडे यांनी वरुड-मोर्शी विधानसभा क्षेत्रातही कमळ फुलणार असल्याचेही जाहीर केले.

# शेतकऱ्यांना अर्ज पूर्ण करण्याचे आवाहन

**अमरावती -** महाकृषी ऊर्जा अभियान पी. एम. कुसुम योजना घटक-ब योजनेंतर्गत अमरावती जिल्ह्यामध्ये शेतकऱ्यांचे परीपूर्ण अर्ज 5 हजार 197 अर्ज ऑनलाईन पद्धतीने महाऊर्जाच्या कुसुम पोर्टलवर प्राप्त झालेले आहेत. या अर्जांपैकी 1 हजार 157 लाभार्थी शेतकऱ्यांनी सौर पंप योजनेचा लाभ घेतलेला आहे. तसेच एकुण 5 हजार 197 लाभार्थी शेतकऱ्यांपैकी 828 लाभार्थी शेतकऱ्यांचे अर्ज अपूर्ण आढळलेले असल्यामुळे त्यांचे अर्ज प्रलंबित यादीमध्ये आहेत.

# ऐतिहासिक विजयाचा भाजपाकडून जल्लोष



**दर्यापूर -** हरियाणा विधानसभा निवडणुकीत भाजपाने पुन्हा एकदा दणदणीत विजय मिळवला. या ऐतिहासिक विजयाचा जल्लोष दर्यापूरातील भाजपकडून शहरातील मुख्य चौकात साजरा करण्यात आला. यावेळी फटाक्याची आतषबाजी करण्यात आली.

यावेळी माजी आमदार रमेश बुंदीलेयांच्यासह इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

(फोटो-महेश बुंदे)



## जाहीर नोटीस

सर्व सामान्य लोकांना सूचित करण्यात येते की, मी माझे पक्षकार नामे 'ज्ञानेश्वर भीमराव खांडेकर आणि सविता ज्ञानेश्वर खांडेकर 'यांच्या वतीने सदरचीजाहीर नोटिस देतो ती, येनेप्रमाणे,

**मिळकतीचे वर्णन** - मौजे-जवळा शहापूर,ग्रामपंच्यायतमालमत्ता क्रं. 2,ता.चांदूर बाजार,जिल्हा. अमरावती.

चतु: सीमा - पूर्व-रस्ता पश्चिम-नारायनराव विधळे यांचे घर,

उत्तर-नारायनराव विधळे यांचे घर, दक्षिण-मधुकर खांडेकर यांचे घर.

सदर मिळकत नामे 'ज्ञानेश्वर भीमराव खांडेकर आणि सविता ज्ञानेश्वर खांडेकर' यांनाग्रामपंच्यायतजवळा शहापूर यांचा तपशीलआणि गाव नमूना 8 नुसार त्यांच्या मालकीची आहेतसेच वरील वर्णनाचीनमूद मालमत्ता ही वडीलोपार्जित आहे. त्यानंतर त्यांनी PIRAMAL CAPITAL & HOUSING FINANCE LTD.BR AMRAVATI. येथे गृह कर्जाकरीता अर्ज केलेला आहे. वरील नमूद मालमत्ता कुठेगहान/राष्ट्रीयकृत /खाजगी/पतसंस्था/सहकारी/इतरबँक बोजा, सदर मालमत्तेवीषयी शासकीय-नीमशासकीय-इतर भानगड, कोनाचा मालकी/वारस हक्क किवा इतर आक्षेप असल्यास खाली दिलेल्या माझ्या मो. नं. वर ही जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या 7(सात) दिवसाच्या आत पुराव्यानीशी हरकत नोंदवावी तद्नंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही ही विनंती.

शिक्का

आपला
ADVOCATE
रवींद्र रू. वाटाणे
स्नेहगंधा कॉलोनी,अमरावती
मो. नं. 9823698745

## ई-निविदा सुचना क्र. 7/2024-2025 (OPEN)

मा. अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांचे वतीने कार्यकारी अभियंता, जि.प. बांधकाम विभाग, अमरावती कामांच्या ई-निविदा पध्दतीच्या महाराष्ट्र शासनाच्या योग्य त्या वर्गातील जिल्हा परिषदेकडील नोंदणीकृत ठेकेदारांकडून मागवित आहेत. कामाच्या निविदा केवळ ई-निविदा पध्दतीने सादर करावयाच्या आहेत. निविदेच्या विस्तुत नमुना महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in चा वेबसाईटवर दि. 04/10/2024 पासून पाहण्यास उपलब्ध आहे.

**निविदेच्या अटी व शर्ती**

1) निविदा सुचना व ईतर आवश्यक माहीती डाऊनलोड करण्याच्या कालावधी दिनांक 04/10/ 2024 वेळ 10.00 वाजता ते दिनांक 10/10/2024 वेळ सायं 17.45 वाजेपर्यंत राहील.

2) निविदा उघडण्याची दिनांक 11/10/2024 वेळ सायं. 17.45 नंतर राहील

3) महाराष्ट्र शासन ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्र. निविदा-2014/प्र.क्र.164/पंरा-7/ बांधकम भवन मर्झबान पथ फोर्ट, मुंबई 400001 दिनांक 15 जुलै 2014 यांचे आदेशान्वये शासन परिपत्रकामध्ये सुचित केल्यानुसार दिनांक 1 ऑगष्ट 2014 पासुन ई-निविदा प्रणाली अंतर्गत विविध विकास कामांची निविदा फी व ईसारा रक्कमेचा भरणा करतांना संबंधीत कंत्राटदाराने निविदा फी व ईसारा रक्कम STATE BANK/ ONLINE NET BANKING द्वारे जमा करण्यात याव्यात. यापुढे ई- निविदा भरतांना OFF LINE-DD स्विकारण्यात येणार नाही, तसे DD सादर केल्यास आपली निविदा रद्द करण्यात येईल याची सर्व संबंधीत कंत्राटदार यांनी नोंद घ्यावी.

4) निविदा फी- (Tender Fee) अनामत रक्कम (EMD) STATE BANK/ ON LINE NET BANKING

5) सदर निविदा फी व ईसारा फी (EMD) SBI/ SBI ON LINE द्वारे भरल्याबाबतचे विहीत नमुन्यातील प्रमाणपत्र (As a Part of E-Tendering document and Process) संबंधरीत SBI/ SBI ON LINE द्वारे भरणा करुन त्याचा युनिक ट्रान्झेंक्शन रजिस्ट्रेशन (UTR) क्रमांक SBD सोबत जोडण्यात आलेल्या नमुना फार्म (Deposit Detail form) मध्ये आपली सर्व माहीती व UTR क्रमांक नोंदवून तांत्रिक लिफाफया सोबत अपलोड करण्यास निविदाकारांना निविदा सुचनेद्वारे सुचित करण्यात येत आहे. निविदा फी नापरतावा राहील.

6) या निविदेची पुढील सर्व कार्यवाही व शुध्दीपत्रके वरील वेबसाईटवरच उपलब्ध राहतील.

7) कोणतेही कारण न देता एक अयवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांनी राखून ठेवलेला आहे.

8) नोंदणीकृत मक्तेदारांनी अधिकृत डी.एस.सी. (Digital Signature Certificate) प्राप्त करुन घेऊन http://mahatenders.gov.in या वेबसाईटवर स्वत: नोंदणी करुन ई-निविदा पध्दतीनेच निविदा सादर करावी.

9) निविदा सादर लागू झालेल्या जीएसटीच्या कराच्या बोज्याचा विचार करुनच निविदा सादर कराव्या.

**कार्यकारी अभियंता**
**जि.प. बांधकाम विभाग**
**अमरावती**

**मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी**
**जिल्हा परिषद, अमरावती**

**अति. मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, अमरावती**

## ग्रामपंचायत कार्यालय, जुना धामणगांव

### ता. धामणगांव रेल्वे, जि. अमरावती

### निविदा सूचना क्र.१ सन २०२४-२५

ग्रामपंचायत कार्यालय, जुना धामणगांव ता.धामणगांव रेल्वे जि. अमरावती यांचे मार्फत सन २०२४-२५ वर्षाकरीता सामान्य निधि व शाहा दुरुस्ती कामाची मोहरबंद निविदा ब-१ टक्केवारी प्रपत्रामध्ये बांधकाम विभाग, अमरावती यांचे वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून मागविण्यात येत आहे. कोऱ्या निविदा ग्रामपंचायत कार्यालय, जुना धामणगाव रेल्वे जि. अमरावती कडून देण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | तालुका | अंदाजित किंमत (लक्ष) | बयाना रक्कम (१%) | निविदा फी | काम पूर्ण करण्याचा कालावधी | निविदा प्रसिद्धीची दिनांक व वेळ | पंजीबद्ध कंत्राटदारांचे वर्गीकरण | कोऱ्या निविदा मिळविण्या साठी अर्ज करण्याचा शेवटचा दिनांक व वेळ | भरलेल्या निविदा स्विकृतीचा दिनांक व वेळ | निविदा उपस्थित सक्षम उघडणे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | नाल्यामध्ये कॉलम बनविणे व रपटा दुरुस्ती | धामणगांव रेल्वे | ३ लक्ष | ३००० | ५०० | ३ महिने | दि. ९/१०/२०२४ सकाळी ११ वा. | योग्य त्या वर्गवारितील | दि. १५/१०/२०२०४ दुपारी ३ वा. | दि. १५/१०/२०२४ सायं. ५ वा. | दि. १६/१०/२०२४ दुपारी १२. वा |
| | शाळा इमारत वर्गखोली दुरस्ती गृहदुरुस्ती | धामणगांव रेल्वे | २.४९ लक्ष | २४९० | ५०० | ३ महिने | | | | | |

टिप-

१) निविदा अटी व शर्ती ग्रामपंचायत कार्यालय, जुना धामणगांव ता. धामणगांव रेल्वे जि. अमरावती यांचे कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

२) निविदा ह्या लिफाफे पद्धतीने सादर करण्याचा आहेत.

३) निविदा स्विकारण्याचे तसेच काही कारणास्तव निविदा रद्द करण्याचे अधिकार सरपंच/सचिव यांनी राखून ठेवलेले आहेत.

४)कामाचे देयक उपलब्ध निधी नुसार देण्यात येईल.

**सरपंच/सचिव**
**ग्रामपंचायत जुना धामणगांव**
**पं.स. धामणगांव रेल्वे**